जिल्हा परिषद बीड अंतर्गत सन २०१६-१७ मधील शासकीय इमारतींच्या देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमाच्या मार्च-२०१७ अखेरच्या <u>दायित्वाकरीता निधी वितरीत करण्याबाबत.</u>
लेखाशिर्ष-२०५९ ४५३१ (योजनांतर्गत)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -२०१८/प्र.क्र. ३९/बांधकाम-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दिनांक: ०७ मार्च, २०१८

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र. २८६ (भाग-१)/पंरा-७,दि.२३.०३.२०१७
२) शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
३) शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७
४) शासन निर्णय क्र. योजना-२०१७/प्र.क्र.८५/बांधकाम-४ , दिनांक ०५.१२.२०१७
५) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांचे क्र. अर्थ/४२००, दिनांक ७.०७.२०१७ चे पत्र.
६) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांचे क्र.बावि/तांशा-२/२२२/१८, दिनांक २१.०१.२०१८ चे पत्र.
७) शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८

प्रस्तावना:-

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांनी त्यांच्या दिनांक २१.०१.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा परिषद बीड अंतर्गत सन २०१६-१७ मधील शासकीय इमारतींच्या देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमाच्या मार्च -२०१७ अखेरच्या दायित्वाकरीता निधी वितरीत करण्याची विनंती केली आहे.

२. शासकीय इमारतींच्या देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत सन २०१६-१७ या वर्षामध्ये बीड जिल्ह्यातील ४७ विविध कामांसाठी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांनी रु. ४२.२० लक्ष ची मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार, बीड जिल्हा परिषदेकडून या ४७ कामांकरीता दिनांक ६.०७.२०१७ च्या पत्रान्वये निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांच्याकडे करण्यात आलेली होती. तथापि, अधिक्षक अभियंता यांनी त्यांच्या दिनांक ७.७.२०१७ च्या पत्रान्वये सदर दायित्वाच्या निधीबाबत यापुढे ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडे मागणी करावी असे कळविल्यामुळे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दायित्वाची रक्कम देखभाल व दुरुस्ती लेखाशिर्ष २०५९४५३१ मधून मिळण्यासाठी मागणी केलेली आहे.

३. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दायित्वाची रक्कम देखभाल व दुरुस्ती लेखाशिर्ष २०५९४५३१ मधून मिळण्यासाठी मागणी केलेल्या कामांमध्ये पंचायत समिती बीड परिसर दुरुस्ती, शाळा दुरुस्ती, जि.प. कर्मचारी निवासस्थान, प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती इत्यादींचा समावेश आहे. सदर कामांना प्रशासकीय मान्यता सन २०१३ मध्ये दिलेली असून तांत्रिक मान्यता व कार्यारंभ आदेश सन २०१४ मध्ये दिलेले आहेत.

४. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता संपूर्ण अर्थसंकल्पास मंजूरी मिळाली असून जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या इमारतींच्या देखभाल दुरुस्ती साठी एकूण रू.२०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित झालेली आहे. त्यापैकी, मंजूर तरतूदीच्या ८० टक्के मर्यादेत लेखाशर्ष-२०५९ ४५३१ (योजनांतर्गत) या लेखाशिर्षांतर्गत खर्च भागविण्याकरीता वित्त विभागाने रू.१६.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिली आहे. सदर तरतुदीपैकी एकूण रक्कम रु. ९.९५ कोटी इतके सहायक अनुदान माहे डिसेंबर, २०१७ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन, संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आले आहे. शिल्लक तरतुदीतून अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी मागणी केलेली दायित्वाची रक्कम रु. ४२,२०,०००/- इतकी रक्कम देखभाल व दुरुस्ती लेखाशिर्ष २०५९ ४५३१ मधून जिल्हा परिषद, बीड यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वित्त विभागाच्या संदर्भीय दिनांक १८.०४.२०१७ , दिनांक ३०.०६.२०१७ व दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार प्रशासकीय विभागांना दिलेल्या निधी वितरणाच्या अधिकाराच्या विहित मर्यादेच्या अधीन राहून, जिल्हा परिषद बीड अंतर्गत सन २०१६-१७ मधील शासकीय इमारतींच्या देखभाल दुरुस्ती कार्यक्रमाच्या मार्च -२०१७ अखेरच्या दायित्वाकरीता एकूण रक्कम रू. ४२,२०,०००/- (अक्षरी रूपये बेचाळीस लक्ष वीस हजार फक्त) इतके सहायक अनुदान माहे मार्च, २०१८ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. इमारती देखभाल दुरुस्ती संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने विहीत केलेले नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे. तसेच, यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे मंजूरीबाबत जी कार्यपध्दती अवलंबिण्यात येत होती, तीच कार्यपध्दती अवलंबून कामे मंजूर केल्याची, तसेच, सन २०१६-१७ मधील शासकीय इमारतींच्या दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर कामे पुर्ण झाल्याची खातरजमा करुनच संबंधितांस देयकाची अदायगी करण्यात यावी. याबाबतचे दुरुस्ती पुर्वीचे व नंतरचे फोटो जतन करुन ठेवण्यात यावेत.

३. या कामांकरीता होणारा खर्च मागणी क्र. एल-३ "२०५९, सार्वजनिक बांधकामे, ८०- सर्वसाधारण, १९६ जिल्हा परिषदा/जिल्हा स्तरीय पंचायत समितींना सहाय्य (०१) स्थानिक (स्तर) क्षेत्रातील योजना, (०१) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये इमारतींच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदान, २७ लहान बांधकामे, (२०५९ ४५३१) (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठीसाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे ज्या कामाच्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, तो त्याच कामावर तात्काळ खर्च करुन, सदर सहाय्यक अनुदानाच्या विनियोजना संबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल, संबंधीत विभागीय आयुक्त यांना पाठवून त्याची प्रत या विभागाकडे आठ दिवसांत पाठविण्याची जबाबदारी संबधित मुख्य वित्त व लेखाअधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. तसेच सदर अनुदानाच्या विनियोजना संबधी महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात आलेल्या उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत तसेच, संबंधित जिल्हा परिषदेने कोण-कोणत्या कामावर निधी खर्च केला याचा तपशिल शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात न आल्यास पुढील सहायक अनुदान वितरीत केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं -२०१७/प्र.क्र.७५/ अर्थसंकल्प -३, दि. १८.०४.२०१७ , शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/ अर्थसंकल्प -३, दि. ३०.०६.२०१७ व शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८ मधील अटी-शर्तीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०३०७११२३५१९२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.03.07 17:46:16 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद
२. मा. सचिव (बांधकामे) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई ४०० ०३२

३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद
४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, महाराष्ट्र - १ मुंबई / महाराष्ट्र - २, नागपूर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड,
६. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद / औरंगाबाद
७. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
८. कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, बीड
९. जिल्हा कोषागार अधिकारी, बीड
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा, बीड
११. उपमुख्य लेखा परिक्षक, जिल्हा, बीड
१२. वित्त विभाग (व्यय- १५ , अर्थ-३) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. कार्यासन अधिकारी- वित्त-१, वित्त-७ व वित्त-१० ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४०० ००१
१४. निवडनस्ती- बांधकाम-४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४०० ००१